# राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र

जुने प्रशासकीय महाविद्यालय इमारत, रु.नं.१,२,५ व ६, हजारीमल सोमानी मार्ग,
छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर, मुंबई-४०० ००१

☎ ०२२-२२०५७४०९ / २२०७२०९७ E-mail : mah-sforum@nic.in Website : https://grahak.maharashtra.gov.in/


वाचा :- १) शासन अधिसूचना क्र.ग्रासंक २०१४/५३९/प्र.क्र.१६३/ग्रा.सं.४, दि.२३ जानेवारी, २०१५

२) या कार्यालयाचे

अ) परिपत्रक क्र.SC/Mah./Est-3/CB/2015/1281, dt.10/02/2015

ब) कार्यालयीन आदेश क्र.SC/Mah./Est-3/Circuit Benches/2015/1869, dt.04/03/2015

क) परिपत्रक क्र.SC/Mah./Est-3/CB/2015/1905, dt.09/03/2015

जा.क्र.राआ/महा./आस्था-३/प.खं.बैठक/२०१५/१९९५ दिनांक ११ मार्च, २०१५

## -:: नोटीस ::-

वरील क्र.१ च्या शासन अधिसूचनेनुसार राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्रचे कामकाज परिक्रमा खंडपीठाद्वारे कोल्हापूर, पुणे, अमरावती व नाशिक येथे करण्यात येणार आहे.

याबाबत या कार्यालयाद्वारे निर्गमित केलेल्या वरील क्र.२ वर दर्शविलेल्या परिपत्रक व कार्यालयीन आदेशानुसार उक्त ठिकाणी खालीलप्रमाणे परिक्रमा खंडपीठांचे कामकाज करण्यात येणार आहे.

| अ. क्र. | परिक्रमा खंडपीठाचे ठिकाण | परिक्रमा खंडपीठाचे कार्यक्षेत्र निश्चित केलेले जिल्हा मंच | परिक्रमा खंडपीठाचे कामकाजाचा कालावधी |
|---|---|---|---|
| १. | कोल्हापूर | कोल्हापूर, सातारा, सांगली, रत्नागिरी व सिंधुदुर्ग | दरमहा पहिल्या सोमवारपासून सुरु होणारा आठवडा |
| २. | पुणे | पुणे, अतिरीक्त पुणे व सोलापूर | दरमहा दुस-या सोमवारपासून सुरु होणारा आठवडा |
| ३. | अमरावती | अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा व यवतमाळ | दरमहा तिस-या सोमवारपासून सुरु होणारा आठवडा |
| ४. | नाशिक | नाशिक, धुळे, नंदुरबार व जळगांव | दरमहा चौथ्या सोमवारपासून सुरु होणारा आठवडा |

या नोटीशीद्वारे सर्व संबंधितांना सुचित करण्यात येते की, संबंधित परिक्रमा खंडपीठाच्या वर नमुद केलेल्या कार्यक्षेत्रातील नवीन प्रकरणांची त्या त्या ठिकाणी नोंदणी करुन सदरील प्रकरणांची सुनावणी त्याच ठिकाणी घेण्यात येणार आहेत.

याशिवाय सध्याच्या मुंबई येथील मुख्य पीठासमोरील व नागपूर तसेच औरंगाबाद परिक्रमा खंडपीठासमोरील वरील नवीन परिक्रमा खंडपीठाच्या कार्यक्षेत्रातील सर्व प्रलंबित प्रकरणे त्या त्या ठिकाणी सुनावणीसाठी वर्ग करण्यात येणार आहेत. प्रलंबित प्रकरणांबाबत ज्या प्रकरणांमध्ये संबंधितांची मुळ खंडपीठासमोर सुनावणी घेण्याची विनंती असल्यास केवळ तीच प्रकरणे त्या त्या मुळ खंडपीठांसमोर कायम ठेवण्यात येतील.

ज्या प्रकरणांमध्ये संबंधितांची मुळ खंडपीठापुढे सुनावणी घेण्याची विनंती असेल, अशी प्रकरणे वगळता इतर प्रलंबित प्रकरणे मुळ खंडपीठापुढे जसजशी सुनावणीसाठी येतील, तसतशी ती नव्या परिक्रमा खंडपीठाच्या सुनावणीच्या कालावधीमध्ये ठेवण्यात येतील व ती प्रकरणे नव्या परिक्रमा खंडपीठापुढे सुनावणीस येतील, अशी नोंद सदरील प्रकरणांच्या रोजनाम्यात करण्यात येईल.

मा.अध्यक्ष, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र यांचे पूर्वमान्यतेने.

आदेशान्वये,

11/03/15

(अ.सा.वैरागडे)
प्रबंधक विधी,
राज्य आयोग, महाराष्ट्र, मुंबई

**प्रतिलिपी माहितीस्तव व योग्य त्या पुढील कार्यवाहीस्तवः**

१) मा.न्यायिक सदस्य व मा.सदस्य, राज्य आयोग, महाराष्ट्र
२) मा.अध्यक्ष व मा.सदस्य, सर्व जिल्हा ग्राहक मंच, महाराष्ट्र राज्य
३) प्रबंधक विधी, राज्य आयोग, महाराष्ट्र, नागपूर व औरंगाबाद प.खंडपीठ
४) प्रबंधक, सर्व जिल्हा ग्राहक मंच, महाराष्ट्र राज्य
५) अधिक्षक आस्था व जन संपर्क अधिकारी, राज्य आयोग, महाराष्ट्र, मुंबई
६) सर्व शिरस्तेदार, राज्य आयोग, महाराष्ट्र, मुंबई तसेच नागपूर व औरंगाबाद परिक्रमा खंडपीठ